# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १७ एप्रिल, २०१३.
## (सकाळी ११.०० ते १२.१५ वाजेपर्यंत)

**(अ) : लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(१) (मंगळवार दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना )**

**श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील रिक्षा चालकांसाठी रिक्षा कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबतचे आश्वासन अद्याप पूर्ण झाले नसणे, तसेच आश्वासनाप्रमाणे तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात ॲटो रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी सामाजिक सुरक्षा व कल्याणनिधी योजना राबविण्याबाबत पुढे काहीही कार्यवाही झालेली नसणे, सदरहू योजना कामगार विभागामार्फत ॲटोरिक्षा, टॅक्सी, व्हॅन, टेम्पो, लॉरीज व बसेस चालविणाऱ्या चालकांसाठी लागू करण्याची होत असलेली मागणी, योजनेत नोंदणीकृत चालकांना वैयक्तिक अपघात मदत, निवृत्ती योजना, अंत्यसंस्कारासाठी मदत व लग्न कार्यासाठी मदत अशा लाभांचा समावेश करण्याची आवश्यकता, यासाठी अधिभार वसूल करण्याकरिता मुंबई मोटार वाहन कर कायद्यात योग्य ती सुधारणा करणे व कल्याणकारी मंडळ स्थापन करणे याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष परिणामी राज्यातील सर्व रिक्षा व टॅक्सी चालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

(२) **सर्वश्री. दिपकराव साळुंखे,** हेमंत टकले, अनिल भोसले, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे, जयवंतराव जाधव, सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नगरपरिषदेकडे मंजूर असलेल्या एकूण ३६३ पदांमध्ये मेहतर समाजाचे ११२ कर्मचारी कार्यरत असणे, हे कर्मचारी सध्या संत पेठ भागातील गुजराती कॉलनी व १९७ ब रामबाग येथे राहत असून, राज्य शासनाच्या दिनांक १९ ऑगस्ट, १९८७ च्या परिपत्रकास अनुसरुन ज्या सफाई कर्मचाऱ्यांची सेवा ३५ वर्ष व त्याहून अधिक इ ाली आहे अशा कामगारांना ती राहत असलेली घरे त्यांच्या नावे करणेबाबत पंढरपूर

नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ७४ द्वारे दिनांक ५ जुलै, २०१२ रोजी मान्यता दिलेली असणे, याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभाग, मंत्रालय, आणि आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ पासून प्रलंबित असणे, अद्याप सदर घरे तेथील मेहतर समाजाच्या कर्मचाऱ्यांच्या नावावर झालेली नसणे, यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(३) **श्री. संजय दत्त वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत काही भागात जाणवत असलेली भीषण पाणी टंचाई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस वाढत्या लोकसंख्येसाठी लागणारे पाणी देणेबाबत मा.मंत्री जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ नोव्हेंबर, २००५ रोजी झालेल्या बैठकीत तसेच, उच्चाधिकार समितीच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २००८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार नवी मुंबई महानगरपालिकेकरिता मोरबे धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारवी धरणातून या महानगरपालिकेस होत असलेले १४० दशलक्ष लीटर पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला उपलब्ध करुन देणेसाठी संबंधित विभागाने कार्यवाही करणे आवश्यक होते, त्याअनुषंगाने, महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनःरुत्थान अभियान योजने अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना राबवून उल्हास नदीतून वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होणेसाठी उद्‌चंन केंद्र व जलशुध्दीकरण केंद्राची कामे पूर्ण करुनही केवळ जलसंपदा विभागामार्फत पाणी साठा आरक्षित न केल्यामुळे ही महानगरपालिका सदर प्रकल्प कार्यान्वीत करण्यास असमर्थ ठरणे, परिणामी, महापालिका क्षेत्रातील नागरीकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. विजयसिंह मोहिते-पाटील**, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण सर्वश्री.सुभाष चव्हाण, दिपकराव साळुंखे, डॉ. सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत व श्रध्दास्थान असलेले श्री विठ्ठलरुक्मीणी देवस्थान पंढरपूर, जि.सोलापूर येथे दर वर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीस

भरत असलेली यात्रा, यात्रेस साधारणपणे १० ते १५ लाख भाविकांचा सहभाग असणे सदर यात्रा सोहळ्यास वैष्णव पंथीय भाविक दिंड्यांसह येत असणे, श्री क्षेत्र आळंदी येथील ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आणि श्री क्षेत्र देहू येथील तुकाराम महाराज यांची पालखी या दोन्ही पालख्या अनुक्रमे आळंदी व देहू या ठिकाणाहून आळंदी-पुणे-सासवड-जेजुरी-निरा-लोणंद-फलटण-माळशिरस-वेळापूर-वाखरी मार्गे आणि देहू-पुणे-यवत-वरंवड-बारामती-इंदापूर-अकलुज-माळीनगर-महाळुंग-श्रीपूर-बोडले-वाखरी मार्गे पंढरपूरकडे जात असणे, सदर पालखी मार्गाने मोठया संख्येने चालणाऱ्या भाविकांना आणि त्यांच्यासमवेत असणारी वाहने व साधने यांना रस्ता फारच अरुंद पडत असल्याने होत असलेला अडथळा, त्यामुळे अपघाताच्या प्रमाणात होत असलेली वाढ, अनेक भाविकांचे दुदैवीरित्या झालेले मृत्यू, वारकरी सांप्रदाय, धर्मदाय न्यासाचे विश्वस्त व लोकप्रतिनिधी यांनी सन २००८-०९ पासून सदर पालखी मार्गाचे चौपदरीकरण करण्यात यावे अशी शासनाकडे सातत्याने केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे वारकरी साप्रंदायामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"तालुका व जिल्हा चंद्रपूर येथील आडेगांव व चोरगांव येथे दिनांक ११ एप्रिल, २०१३ रोजी वाघाने तेथील ग्रामस्थांवर केलेला हल्ला, या हल्ल्यात, आडेगांवाला सकाळी ७.०० वाजता ठार मारलेल्या सहाजणांचे पोस्टमार्टम होत असतांनाच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उपस्थित जनता, वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस खात्याचे अधिकारी यांच्यासमोर एका ७० वर्षाच्या महिलेला वाघाने ठार मारणे, दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजी चोरगांव येथे वाघाने सकाळी ८.०० वाजता १६ वर्षाच्या मुलीवर हल्ला करुन ठार मारणे, तसेच, तिच्या आईला जखमी करणे, पुन्हा १३ तारखेला सकाळी ८.०० ते ८.३० वाजता वाघ तिथे येणे, सादगड सावली येथे दिनांक २५ मार्च, २०१३ ला एका महिलेला वाघाने मारल्यानंतर त्या नरभक्षक वाघाला मॅक्रोचिप न लावता दुसऱ्या जंगलात नेऊन सोडणे, त्याच वाघाने आडेगांव व चोरगांव येथे हल्ला केल्याचा संशय निर्माण होणे, त्यामुळे जनतेत पसरलेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात अनुसूचित जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेतील ४६६ प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, परिणामी मागासवर्गीय समाजात उद्योजक तयार व्हावेत आणि त्यातून लोकांना रोजगार मिळावा या संकल्पनेस बसलेली खीळ, राज्य भरातील या प्रलंबित प्रस्तावांमध्ये तब्बल १२५ प्रस्ताव हे केवळ औरंगाबाद जिल्ह्यातील असल्याचे उघडकीस येणे, सदर प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यात यावेत, अशी विविध संघटनांनी शासनाकडे वारंवार केलेली मागणी, या संदर्भात अद्याप कोणतीच कारवाई न होणे, परिणामी, राज्यातील अनुसूचित जातीच्या लघु उद्योगात पसरलेले नैराश्याचे वातावरण, त्यांनी आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री जयप्रकाश छाजेड,** अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, मोहन जोशी, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. अनिल भोसले, जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नर्सिंग संस्थांना मान्यता देणे, परिक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासून निकाल जाहीर करणे, आदी महत्वपूर्ण कामांची जबाबदारी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून काढून घेऊन परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव सप्टेंबर, २०१२ पासून शासनाकडे प्रलंबित असणे, स्वतंत्र शिक्षण मंडाळाअभावी शिखर संस्थेचे नियम धुडकावून खासगी नर्सिंग संस्थांना परस्पर मान्यता देण्यापासून पेपरफुटीसारख्या गंभीर घटना राज्यात सातत्याने वाढीस लागणे, परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ तात्काळ स्थापन करण्याची गरज, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही."

(८) **सर्वश्री. भगवान साळुंखे,** रामनाथ मोते, नागो गाणार, चंद्रकांत पाटील, **डॉ. रणजित पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"माहे एप्रिल २०१० पासून राज्यामध्ये सहा ते चौदा वयोगटातील बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी सुरु होणे, सर्व प्राथमिक शाळांनी या अधिनियमाच्या यशस्वीतेसाठी सुसज्य इमारतीसह दहा मानकांची पूर्तता दिनांक ३१ मार्च, २०१३ पूर्वी करणे बंधनकारक असणे, सर्व शाळांनी या मानकांची पूर्तता

केली अथवा नाही याबाबत शासनाने माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये प्रश्नावली स्वरुपात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे ज्या शाळांनी या मानकांची पुर्तता केलेली नाही किंवा एक मानक जरी कमी पडले तरी त्या शाळेची मान्यता काढणे, असे प्रकार सोलापूर जिल्ह्यात अधिक घडल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये सोलापूर शहरातील सेवासदन शिक्षण संस्थेच्या कन्याशाळेचा समावेश असणे, अशा शाळांना बचावाची संधी देण्याची असलेली आवश्यकता, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(ब) : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने - (असल्यास).**

**(क) : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## (दुपारी १२.३० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) सोमवार, दिनांक ८ एप्रिल, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **(अ)** "मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोली, यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

: **(ब)** "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०११-२०१२ चा वर्षाचा प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

: **(क)** "महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष अहवाल आणि दिनांक ३ सप्टेंबर, २०११, ९ सप्टेंबर, २०११, ३० नोव्हेंबर, २०११, ८ डिसेंबर, २०११, २२ डिसेंबर, २०११ व २७ जून, २०१२ रोजीचे सहा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह" सभागृहासमोर

ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २००९-२०१० या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** : "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०११-२०१२ चा चौदावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **आदिवासी विकास मंत्री** : "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-२ यांचा सन २००८-२००९ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(अ)** "मुंबई विद्यापीठ यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांचे सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा बारावा अहवाल सादर करणे.**

**चार : सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा अहवाल सादर करणे.**

**पाच : लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**महसूल मंत्री** : दिनांक ८ ऑगस्ट, २०११ रोजी श्री. किरण पावसकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार, "क्रिकेट कल्चर अकादमी या संस्थेस दिलेल्या भूखंडाचा वापर वेगळ्याच व्यक्तीने कल्चर क्रिकेट अकादमी या नावाने ट्रस्ट

स्थापन करुन भूखंड लाटण्याचा घडलेला प्रकार" याबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके -**

**(अ) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार खंडशः विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३.

क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. रामदास कदम, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानसभेने संमत केल्यास - विचार खंडशः विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(२)** सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३.

सात : **सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्री.सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.विजय गिरकर, रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, डॉ.रणजीत पाटील, ॲड.अनिल परब, श्री.भगवान साळुंखे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -**

"सन २००२ पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे, गत काही वर्षातील प्रमुख लेखाशीर्षामधील शेकडो कोटी रूपयांची रक्कम अखर्चित राहिल्याने अनुसूचित जातीचे बांधव विकासापासून वंचित राहणे, सन २०१२-१३ मध्ये देखील बऱ्याचशा योजनांमधील ५० टक्क्यापेक्षा अधिक रक्कम अखर्चित असल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जातीच्या बांधवांना दारिद्रय रेषेच्यावर आणावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने महात्मा फुले मागासवर्गीय

महामंडळ मर्यादित व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित या राज्य शासनाच्या उपक्रमाची स्थापना करण्यात येणे, परंतू या महामंडळातील योजनांचा लाभ केवळ जवळच्या कार्यकर्त्यांनाच देण्यात आल्याने अनुसूचित जातीतील गरीब बांधव या योजनांपासून वंचित राहणे, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, महार वतनांच्या जमिनीचा सुध्दा काही विशिष्ट व्यक्तिंनी स्वहितासाठी वापर केल्याने अनुसूचित जातीच्या कोट्यवधी बांधवांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष, त्याचप्रमाणे अनुसूचित जमातींच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या व्यवसायांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येवूनही दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांना शासनाकडून संरक्षण मिळाल्याचे निदर्शनास येणे, भ्रष्टाचारामुळेच आदिवासी बांधव आजही विकासाच्या मार्गापासून वंचित असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच अर्थसंकल्पामध्ये बेदखल कुळांच्याबाबतीत कोणतीही तरतूद न करणे, त्याचप्रमाणे, कोकण प्रदेश विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सन २००९ मधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घोषित केलेल्या कोकण विकास पॅकेजमध्ये १९०० कोटी रूपयांची रक्कम अद्यापही अखर्चित असणे, तसेच अनेक निसर्गरम्य ठिकाणे, जागतिक पातळीवर स्पर्धा करू शकतील असे स्वच्छ समुद्र किनारे कोकणाला लाभुनही अर्थसंकल्पात कोकणाला आवश्यक तो निधी न मिळाल्याने कोकणातील पर्यटनाचा विकास रखडलेला असणे, अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद न केल्याने सिंचन, कृषीपंप, रस्ते, इ. च्या अनुशेषामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण कोकणातील जनतेमध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

आठ : **(मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"गत ३६ महिन्यात वीजेचे दर तब्बल १२ वेळा वाढणे, औद्योगिक वीजेचे दरदेखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, वारंवार वीज दरवाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक

आयोगाने कोणताही विरोध न करता मंजूर करणे, भारनियमनमुक्तीसाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युतनिर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती वाढविण्याची गरज असताना प्रत्यक्षात सद्य:स्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीज प्रकल्पांमार्फत होणारी वीज निर्मिती सन २००८ च्या तुलनेत कमी होणे, तसेच उरण व लातूर येथील गॅसवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्पामधून अपेक्षित विद्युत निर्मिती न होणे, प्रत्यक्ष वीजनिर्मितीत वाढ न झाल्याने माहे डिसेंबर, २०१२ अखेर राज्य भारनियमनमुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषीपंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा करूनदेखील कृषीपंप धारकांकडून वाढीव दराने वीज बील आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाजामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये प्रामुख्याने मीटर खरेदी, कोळसा खरेदी, पायाभूत सुविधांची कामे, महापारेषणमार्फत होणारी कामे इत्यादींचा समावेश असणे, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज कंपन्यांचे काम समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने देखील आपल्या अहवालात नमूद करणे, परिणामी, वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यामुळे या विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"बीड जिल्ह्यातील मौजे इर्ला-डुब्बा-वंजारवाडी-डावरवाडी या ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येणे, सिंदफणा नदीच्या एका काठावर वंजारवाडी व डावरगाव असून दुसऱ्या काठावर डुब्बा व इर्ला ही गावे असल्यामुळे नदीतील पाण्यामुळे गावातील ग्रामस्थांना ये-जा करणे शक्य होत नसणे, भौगोलिकदृष्ट्या दोन गावांना वेगवेगळ्या पंचायत समिती, तहसिल कार्यालय असल्यामुळे प्रशासकीय दृष्टीने कामांना अडचण निर्माण होणे, भौगोलिक दृष्टीने गावांमध्ये रस्ता नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होणे, ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणा बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.विजय सावंत व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील गलिच्छ वस्त्या, झोपडपट्ट्या यांचे पुनर्वसन स्वरुपात सुधारणा करुन मुंबई 'स्वच्छ मुंबई, सुंदर मुंबई' हे स्वरुप प्राप्त व्हावे यादृष्टीने शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन

प्राधिकरणाची स्थापना केलेली असणे, तळागाळातल्यांना सुसज्ज घरे मिळून मुंबई शहर झोपडपट्टी मुक्त होईल त्यामागील शासनाच्या उदात्त हेतूची परिपूर्ती सुरळीतपणे होण्याबाबतीत यासंबधीच्या कायद्याची परिणामकारकरित्या न होणारी अंमलबजावणी, यासंदर्भात तक्रारीकडे संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून बूजून करण्यात येत असलेले दुर्लक्ष व झोपडपट्टी रहिवाश्यांना मदत न करता विकासकाकडून पैसे घेवून करण्यात येत असलेला वाढत्या प्रमाणावरील भ्रष्टाचार, संबधित अधिकाऱ्यांच्या या वाढत्या भ्रष्टाचारामुळे हाती घेतलेल्या अनेक प्रकल्पांना बसलेली खीळ, या बाबी लक्षात घेता, झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्राधिकरणामार्फत सुरु करण्यात आलेले प्रकल्प सुरळीत चालू करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.